तरुण भारत बुधवार, २४ ऑगस्ट २०२२

# 'रवळनाथ'तर्फे ज्येष्ठ सभासद, पाल्यांचा सन्मान

**प्रतिनिधी**
जयसिंगपूर

श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे जयसिंगपूर परिसरातील पंच्याहत्तरी पूर्ण केलेल्या सभासदांसह, सेवानिवृत्त सभासद व यशवंत पाल्यांचा सत्कार झाला. अध्यक्षस्थानी संस्थापक अध्यक्ष एम एल. चौगुले होते.

येथील जयसिंगपूर शाखा कार्यालयात हा कार्यक्रम झाला. १०६ वर्षाचे ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी आदगोंडा देवगोंडा पाटील, शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. दत्ता पाटील, ज्येष्ठ संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रा. डॉ. पाटील म्हणाले, श्री रवळनाथने सहकारातील आदर्श हौसिंग फायनान्स बरोबरच लोकाभिमुखता आणि सामाजिक बांधिलकीचा वस्तुपाठ समाजासमोर ठेवला आहे. प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर म्हणाले, रवळनाथाने सर्वोत्तम कामकाजा बरोबरच वित्त व्यवस्थापन व अर्थ साक्षरता चळवळीत योगदान दिले आहे. चौगुले, ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी आदगोंडा देवगोंडा पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी पंच्याहत्तरी पूर्ण झालेले शिवपुत्र आरबोळे, सेवानिवृत्त शितल देमाण्णा, दत्तात्रय देवकाते, आदर्श शिक्षक अनिल खिलारे, यांच्यासह यशवंत पाल्यांचा सत्कार करण्यात आला.



**जयसिंगपूर : 'रवळनाथ'च्या येथील जयसिंगपूर शाखेत यशवंत पाल्य आयुष कोरे यांचे पालक प्रा. राजेंद्र कोरे यांचा सत्कार झाला. शेजारी आदगोंडा पाटील, संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, प्राचार्य आर. एस. निळपणकर व इतर.**

दत्तात्रय देवकाते, प्रा. शिवपुत्र आरबोळे यांनी मनोगत व्यक्त केले. जयसिंगपूर शाखा सल्लागार प्रा. माणिक घुमाई यांनी प्रास्ताविक केले. प्रा. राजेंद्र कोरे यांनी सूत्रसंचालन केले. अनिल घोलप यांनी आभार मानले. यावेळी शाखा सल्लागार महावीर चौगुले, श्रीकांत चौगुले, शाखाधिकारी किरण शहा, अकौंटंट शिवानंद काळे, सभासद व कर्मचारी उपस्थित होते.